# प्रेसनोट दिनांक – १२/०७/२०२४

**दि. ११/०७/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ३९२/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(४), ३५१(२)(३), ३(५), आर्म अॅक्ट कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७(१), १३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०७/२०२४ रोजी रात्री २१.१५ वाजताचे सुमारास रॉयल एस.के.मेन्स वेअर, अष्टविनायक चौक, संगम सोसायटी, मोरेवस्ती, चिखली पुणे या फिर्यादी यांच्या दुकानामध्ये

गुन्हा दाखल :- दि.११/०७/२०२४ रोजी २२/११ वा

फिर्यादी :- प्रफुल्ल मधुकर कांबळे वय ३० वर्षे, धंदा कापड दुकान, राह.नायर कॉलनी, ज्ञानेश्वर माउली बंगलो, साने च मोरेवस्ती, चिखली पुणे मुळ राह. लहुलव्हारा, ता.परांडा, जि.धाराशिव

आरोपी :- अनोळखी ३ इसम , **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे रॉयल एस.के.मेन्स वेअर, अष्टविनायक चौक, या दुकानामध्ये विक्रीसाठी ठेवलेले तयार रेडीमेड कपडे ग्राहकांना दाखवत असताना अंदाजे २० ते २२ वयोगटातील तीन अनोळखी इसम फिर्यादी यांच्या दुकानामध्ये आले व त्यांनी फिर्यादी यांना आम्हास कपडे दाखव असे म्हणाले तेव्हा फिर्यादी यांनी त्यांना कपडे दाखवले असता त्यांना ते पसंत पडल्याने त्यातील १) एक इसम याने ट्रायल रुमध्ये जावुन शर्ट व पॅन्ट अंगात घातले व इतर दोघांनी कपडे पसंत करुन याचे पैसे आम्ही तुला देणार नाही असे म्हणाले तेव्हा फिर्यादी त्यांना तुम्हाला कपडयांचे पैसे दयावे लागतील असे म्हणाले असता त्यांचेपैकी दोघांनी त्यांचे शर्टच्या आतुन कंबरेला लावलेले पिस्टल बाहेर काढुन ते पिस्टल फिर्यादी यांचेवर रोखुन "आता तुला खल्लास करुन टाकतो. तुला पैसे मिळणार नाहीत. तुला आम्ही कोण आहोत हे माहीती नाही, आम्ही नायर कॉलनीमध्ये मर्डर केला आहे. तुला कोठे जायचे तेथे जा. आम्ही या भागातले डॉन आहोत" अशी धमकी देवुन एकुण ४०००/- रुपये किंमतीचे कपडे फिर्यादी यांना पिस्टलचा धाक दाखवुन जबरदस्तीने घेवुन गेले आहेत म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोलीस उपनिरीक्षक मासाळ, पोलीस उपनिरीक्षक

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी २०९/२०२४भादवी कलम ३१८(४),३३६(२),३३६(३),३४०(२),३(५),बाल विवाह प्रतिबंधक कायदा ९,१०,११ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.७/७/२०२४ रोजी १२:००वा च्या सुमारास फ्री इटरनॅशनल ब्युरो ऑफ मॅरेज आळंदी येथे ता.खेड जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/०७/२०२४ रोजी ०२.०६ वा

फिर्यादी :- बापु नारायण पगडे वय ५९ वर्षे धंदा शेती रा पगडेवस्ती,च-होली खुर्द ता. खेड, जि पुणे

आरोपी :- १) सागर तात्याबा सरवदे वय २० वर्षे ३ महिने रा कोयाळी ता खेड जि पुणे ,
२ श्रध्दा बापु पगडे वय २० वर्षे रा च-होली खुर्द ता खेड जि पुणे
३) फ्री इटरनॅशनल ब्युरो ऑफ मॅरेज आळंदीचे मुकंद वाघमारे. **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी नं १ ते ३ यांनी फिर्यादी यांची फसवणुक करून त्यांचे लग्न करता यावे याकरिता संगनमत करून आरोपी क्रं १ याचे जन्म तारखेत खाडाखोड करून मुळ जन्मतारखेमध्ये दि.७/५/२००३ अशी नमुद तारीख केली व त्या तारखेवरुन मुळ आधारकार्ड वरिल जन्मतारखेमध्ये बदल करून घेतला या कागपत्राची फ्री इंटरनॅशनल ब्युरो ऑफ मॅरेज आळंदीचे मालक आरोपी नं ३ यांनी कोणतेही खातरजमा न करता आरोपी नं १ व २ यांचे लग्न लावुन दिले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि साळी ९४०५४०४३४४

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ३९३/२०२४ भा.द.वि.कलम ४१९,४२०,माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(सी),६६(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०६/२०२४ रोजी चिखली पुणे याठिकाणी राहते घरी.. |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०७/२०२४ रोजी २२/५७ वा. |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी वय ३० वर्षे, धंदा - नोकरी, रा. जाधववाडी, चिखली |
| आरोपी | :- | मोक्र ९८२३०५३६४९, यावरील इसम व जन स्मॉल फायनान्स बँकेच्या खातेक्रमांक ३५०९०२०००१०९९५८२ **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी अनोळखी इसम मो क्र ९८२३०५३६४९ याने फिर्यादी यांचा मोबाईल क्रमाकावर फोन करुन तो फेडेक्स कुरीयर मधुन अजय मारो, बोलत असुन फिर्यादी यांचा एम्लॉई आयडी FAF301280 असा आहे असे खोटे सांगुन तुमच्या नावाने २० जुन २०२४ रोजी बुक केलेले पार्सल हे मुंबई ते इराण जात आहे व त्याचा पार्सल आय डी २२८९३२१२९१८७ त्या पार्सलमध्ये दोन किलो कपडे, एक लॅपटॉप, ५ क्रेडीट कार्ड, व २५ एल एस डी चे स्ट्रीप आहे सदरचे पार्सल मोबिन तेहराणी याने तुमच्या आधारकार्डचा मिसयुझ करुन हे पार्सल मुंबई ते इराण पाठवले जात आहे जर हे तुमचे नसेल तर मी त्याबाबत क्राईम ब्रँच मुंबई एन.सी.बी कडे तक्रार केलेली आहे व त्याचा तक्रार नंबर NCB/MH/1085/0624 असा आहे असे सांगुन व फिर्यादीस स्काईप आयडी live:.cid.a6745966c61848f2 वरुन फोन आला की, आमच्याकडे प्राप्त झालेली तक्रार नंबर NCB/MH/1085/0624 नुसार मी प्रदीप सावंत बोलत असुन मी मुंबई पोलीस क्राईम ब्रँच एन.सी बी डिपार्टमेंटमधुन फोन केलेला आहे असे सांगुन त्यांनी त्याचे आयडी कार्ड स्काईपवर पाठवुन त्याने फिर्यादीस त्याचे आयडीकार्ड पाठवुन फिर्यादीस पटवुन दिले की ते पोलीस आहेत त्यानंतर त्याने देखील फिर्यादीस आधारकार्ड मिसयुझ झाले असल्याचे सांगुन फिर्यादीस त्यांचे आधारकार्ड पाठविण्यास सांगुन पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट ई मेल मिळुन जाईल असा विश्वास दिला म्हणुन फिर्यादी यांनी त्यांचे आधारकार्ड त्याला पाठविल्यानंतर फिर्यादी यांच्या आय सी.आय.सी.आय खात्यातील खातेवरुन फिर्यादीचे संमतीशिवाय फिर्यादीचे आधारकार्डचा दुरुपयोग करुन इंन्सन्ट प्री ॲप्रुव्ह लोन मंजुर करुन काही मिनिटातच अनोळखी जन स्मॉल फायनान्स बँकेच्या खातेक्रमांक ३५०९०२०००१०९९५८२ व आय.एफ एस कोड JSFB0003509 यावर ट्रान्सफर करुन फिर्यादीची एकुण १९,११,७४१/- रुपये (अक्षरी - एकोणीस लाख आकरा हजर सातशे एक्केचाळीस ) रुपये रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री.विठठल साळुंखे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक ९५९४७७४२३८ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ३२४/२०२४, भा.दं.वि.कलम ४२० माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चेकलम ६६ (ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१२.०६.२०२४ रोजी ०९.०० ते दि.१४.०६.२०२४ रोजी १६.३० वा. चे दरम्यान संभाजी चौक आकुर्डी,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०७/२०२४ रोजी १८/३९ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय २६ वर्षे धंदा-नोकरी रा संभाजी चौक आकुर्डी पुणे |
| आरोपी | :- | १) वॉटस् ॲप ग्रुपचे ॲडमिन सुमन यादव मो.न. ८०८५६६६८५९ व ७६१९०३३७६६, ९०३९९५८५६१ तसेच ९९५४९४९६९८, २)https://t.me/Amazon668990 व https:/btc.tradingvidya.com/wap लींक वापरकर्ता<br>३)Gopalgeneral@ybl आय डी चा फोन पे धारक मोहित कुमार गुप्ता<br>४)Sager3333.sv1@okhdfcbank आय डी चा फोन पे खाते धारक सागर वांगा एस ओ श्रीनिवासा राव<br>५) पे टीएम धारक करण पानवार , ६) multitrade and co यांचे AC no 4597022423141904 धारक<br>७) जे डी इंटरप्राईज खाते क्र.२३९७०५००२१४८ चा धारक, ८)सचिन कृष्णा सारंगे खाते क्र ६६३००००१०००३०८५८ , ९)महामाया ईलेक्ट्रीकल्स खाते क्र. ४३००९४१९३७६<br>१०)परहित सोल्युशन प्रा.लि. खाते क्र. ०२२४०५५००५४६<br>११) ममत्वा फॉऊडेशन खाते क्र.००००००४२६८२४७४३४७<br>वरील मोबाईल क्रमांक व बँकखाते क्रमांक चा अज्ञात वापरकर्ता, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मोबाईल क्र.नमुद मो नं.८९५६३५७०४६ चे वॉटस्ॲप ग्रुपला ॲड करुन ॲमेझॉन प्रोडक्टचे पार्ट टाईम जॉब करीता Amazon part Time India Qs5 या वॉटस्ॲप ग्रुपला फिर्यादीस ॲड करुन त्या वॉटस् ॲप ग्रुपचे ॲडमिन सुमन यादव मो.न. ८०८५६६६८५९ व ७६१९०३३७६६, ९०३९९५८५६१ तसेच ९९५४९४९६९८ या क्रमांकाचे मोबाईल धारक यांनी फिर्यादीस संपर्क करुन पार्ट टाईम जॉब करण्यासाठी व त्या माध्यमातुन पैसे कमविण्याचे अमिष दाखवुन वेळोवेळी टास्क देवून देण्यात येणारा मोबदला रक्कम काढण्यासाठी फिर्यादीस वेळोवेळी वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे पाठविणेस सांगुन फिर्यादीची ८,०९,६५६/-रूपये एवढया रक्कमेची ऑनलाईन फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | शत्रुघ्न माळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक ९८९२७७१७७२ |

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ६३९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१),११५(२),३५२, ३(५) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०९/०७/२०२४ रोजी रात्रौ २१.०० वा. सुमा. दत्त मंदिराजवळ संत तुकाराम नगर पिंपरी पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/०७/२०२४ रोजी २०.३६ वा.

फिर्यादी :- पियुष रवि कालेकर वय १९ वर्षे धंदा शिक्षण रा. २१४/१६७८ संत तुकाराम नगर पिंपरी पुणे

आरोपी :- १)प्रथमेश लोंढे ,२)बंटी सुतार,३)बिट्या (पुर्ण नाव माहीत नाही), निखील (पुर्ण नाव माहीत नाही) सर्व रा. संत तुकाराम नगर पिंपरी पुणे, **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांने त्याचे मोबाईल फोनवरुन आरोपी क्रं १ यांस फोन करुन "तु ईश्वरी वाईकर हीला फोन करुन त्रास देवु नकोस" असे म्हणाले असता त्याचा राग मनात धरुन आरोपी क्रं. १ याचे मोबाईलवरुन आरोपी क्रं. २ यांनी फोन करुन फिर्यादीस दत्त मंदिर संत तुकाराम नगर पिंपरी पुणे येथे बोलावुन घेवुन आरोपी क्रं. १ यांनी फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ करुन दगड फेकुन मारला असता फिर्यादी हे सदर ठिकाणाहुन पळत जावुन त्यांच्या आई वडिलांजवळ गेले असता आरोपी क्रं. १ व २ यांनी शिवीगाळ करुन हाताने फिर्यादीस मारहान केली आरोपी क्रं. २ याने फिर्यादी यांच्या डोक्यास बिअरची बॉटल मारुन डोक्यास दुखापत केली सदर ठिकाणी आरोपी क्रं. ३ व ४ आले व त्यांनी कशाच्या तरी सहाय्याने फिर्यादीचे पाठीवर,बरगड्यावर मारहान केली तसेच आरोपी यांनी फिर्यादी यांचे आई वडिलांस हाताने लाथाबुक्कांनी मारहान केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो.हवा. कुंभार पिंपरी पो.स्टे.पिं.चिं.मो.नं.८३२९२९१४८०

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी ३११/२०२४भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१(४), ३०५(ए)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ता.११/०७/२०२४ रोजी रात्रौ १२.३० वा ते पहाटे ०४.१० वा चे दरम्यान २०/१, सदगुरूकृपा निवास, काटेवस्ती, कोकण मराठा हॉल शेजारी, दिघी, ता. हवेली, जि. पुणे यठिकाणी

गुन्हा दाखल :- दि.११/०७/२०२४ रोजी १६/४८ वा

फिर्यादी :- समिर दिनकर कोपर्डे, वय ४२ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा. २०/१, सदगुरूकृपा निवास, काटेवस्ती, कोकण मराठा हॉल शेजारी, दिघी, ता. हवेली, जि. पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद ता. वेळी ठिकाणी यातील फिर्यादी यांचे जुने घराचे दरवाजाला लॉक लावून बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घराचे दरवाजाचे लॉक तोडुन तसेच त्यांचे भावाचे बेडरुमची बाहेरुन कडी लावून घरातील लोखंडी कपाटातील ९ तोळे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने , २ किलो चांदीची ताटे व रोख रक्कम असा एकुण २,८२,०००/- रू. कि. चा मुददेमाल घरफोडी चोरी करून चोरून नेली आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- नितीन अंभोरे, सहा. पोलीस निरीक्षक ८४५४०११०५२

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ४३०/२०२४बी.एन.एस.कलम-१०६(१)२८१,१२५(ब),मो.वा.का. कलम-१८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.११/०७/२०२४ रोजी ११.४७ वा चे सुमारास मौजे् सावरदरी गावचे हददीत एअर लिक्वीड चौक ता.खेड जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/०७/२०२४ रोजी १६/५६वा.

फिर्यादी :- भिम शेषराव जाधव , वय-१९ वर्षे धंदा ड्रायव्हर,रा. महाराष्ट्र बॅकचे शेजारी रुममध्ये महाळुंगे ता.खेड जि. पुणे, मुळ रा.माउली ता.मानोरा जि.वाशीम

आरोपी :- विशाल ज्ञानेश्वर तरस वय ३७ वर्षे रा.सावरदरी ता.खेड जि.पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादी सोबत पवन राजेश गेडाम असे स्कुटी मोटार सायकल नं.एम.एच.१४/के.एल.५९५२ वरुन महाळुगे एच.पी.चौक , वासुली मार्गे मिंडेवाडी ता.मावळ जि.पुणे येथे जात असताना सदर ठिकाणी आले असता पाठीमागुन येणारा पाण्याचा टॅकर नंबर -एम.एच.१२/एच.डी. ०१३७ वरील चालक याने त्याचे ताब्यातील टॅकर हे भरधाव वेगात ,हायगयीने अविचाराने रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहन चालवुन फिर्यादीचे ताब्यातील स्कुटीला धडक देवुन अपघात केला. सदर अपघातात पवन राजेश गेडाम, वय २९ वर्षे रा. महाळुंगे ता.खेड जि.पुणे याचे पोटावरुन चाक जावुन गंभिर दुखापतीस तसेच त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोसई/ जाधव ,महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन ९९२२९४७६२३

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २९४/२०२४ बी.एन.एस. क.१०६(१), २८१, मोटर वाहन कायदा कलम १८४, १३२(१)(क), ११९/१७७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०७/२०२४ रोजी २३/५० वा चे सुमारास स्व.मनोहर पर्रिकर अंडर पास खाली, पिंपळे गुरव,पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक- ११/०७/२०२४ रोजी १२/५० वा. |
| फिर्यादी | :- | योगीराज रवीराज राजबिंडे, वय-३४ वर्षे,धंदा- नाकरी रा. फ्लॅटनं १०१ अमरनाथ पॅरेडाईज दाभाडे चौक च-होली बुद्रुकता हवेली जि पुणे मूळ गाव १८५३, घोंगडे गल्ली प्रदक्षिणा रोड पंढरपुर जि सोलापुर |
| आरोपी | :- | अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाऊ (मयत)नामे संकेत रविराज राजबिंडे ,वय-३० वर्षे हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल नं. एम.एच.१३/ए.डब्ल्यु. १३४९ ही पिंपळे सौदागर बाजुकडुन भोसरी बाजुकडे चालवीत घेवुन जात असताना स्व.मनोहर पर्रिकर अंडर पास खाली,पिंपळे गुरव,पुणे येथे अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हायगायीने,निष्काळजीपणे,रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटारसायकलीस धडक देवुन अपघात करुन अपघातात त्याचे गंभिर दुखापत करुन त्याचे मृत्युस कारणीभुत होऊन तो पळुन गेला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री चापाले,पोलीस उप-निरीक्षक ७७१९९२९५२ |